विशेष शाखा,पोलीस आयुक्त कार्यालय सोलापूर शहर
नविन प्रशासकीय इमारत, गांधीनगर, सोलापूर
दुरध्वनी क्र. - ०२१७-२७४४६०५ Email ID :-. pisb.cpsol@mahapolice.gov.in

## महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) आदेश

जा.क्रं.विशा/प्रसिध्दी/११७५/२०२५ सोलापूर शहर, दिनांक :- २८/०३/२०२५

--- ००० ---

ज्या अर्थी, सोलापूर शहर हे महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या प्रमाणावर धार्मिक सण, उत्सव, जयंती, पुण्यतिथी साजरे करणारे शहर आहे. सोलापूर शहरात छोट्या-मोठ्या कारणावरुन संप, आंदोलने, निदर्शने इत्यादि होत असतात. शहरात आगामी काळात गुढीपाडवा, रमजान ईद, रामनवमी, महावीर जयंती, महात्मा फुले जन्मदिन, हनुमान जयंती असे कार्यक्रम संपन्न होणार आहेत. तरीच मराठा, ओबीसी व धनगर आरक्षण वगैरेच्या माध्यमातून कायदा व सुव्यवस्थेस बाधा होण्याची दाट शक्यता आहे. त्याकरीता महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

त्या अर्थी, मी डॉ. दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे/विशा), सोलापूर शहर, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (अ ते फ) अन्वये असलेल्या अधिकारास अनुसरुन, पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहरच्या हद्दीत खालील प्रमाणे वर्तन करण्यास मनाई करीत आहे.

अ) शस्त्रे, तलवारी, भाले, सुरे, बंदुका, काठया किंवा झेंडा असलेली काठी किंवा इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु बरोबर नेणे.

ब) कोणताही ज्वालागृही अगर स्फोटक पदार्थ वाहुन नेणे.

क) दगड अगर तत्सम शस्त्रे साठविणे अगर बाळगणे.

ड) व्यक्ती अगर प्रेत अगर त्यांचे प्रतिमा याचे प्रदर्शन करणे.

इ) सार्वजनिक रितीने घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे.

फ) असभ्य हावभाव करणे, असभ्य भाषा वापरणे सभ्यता अगर नितीविरुध्द निरनिराळया जमातीच्या भावना दुखावल्या जातील व त्यामुळे त्यांच्यात भांडणे, बखेडे निर्माण होतील अशी सोंगे अगर चिन्ह अगर दस्तऐवज अगर जिन्नस तयार करुन त्याचा प्रचारासाठी उपयोग करणे.

हा आदेश खंड अ ते फ हे ज्या सरकारी नोकरांना त्यांचे कर्तव्य व अधिकार बजावण्यासाठी उपनिर्दीष्ट वस्तु हाताळाव्या लागतात आणि ज्यांनी सक्षम पोलीस प्राधिकरणाची परवानगी घेतली आहे. अशा व्यक्तींना परवानगीतील अटीस पात्र राहुन सदरचे आदेश लागु पडणार नाहीत.

सदरचा आदेश हा **दिनांक ३०/०३/२०२५ रोजी ००:०१ वाजले पासून ते दिनांक १३/०४/२०२५ रोजीचे मध्यरात्री २४:०० वाजेपर्यंत** पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अंमलात राहील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्यानिशी दिला आहे.

पोलीस उप-आयुक्त विशा / गुन्हे शाखा सत्यमेव जयते सोलापूर शहर

**स्थळ : सोलापूर शहर**
**दिनांक : २८/०३/२०२५**

( डॉ. दीपाली काळे )
**पोलीस उप आयुक्त, (गुन्हे/विशा)**
**सोलापूर शहर.**

प्रति,

०१. वपोनि फौजदार चावडी/जेल रोड/एमआयडीसी/जोडभावी पेठ/सदर बझार/ विजापूर नाका/सलगरवस्ती पोलीस ठाणे/गुन्हे शाखा.
०२. सहाय्यक पोलीस आयुक्त, विभाग -१ / विभाग-२ / नियंत्रण कक्ष, सोलापूर.
०३. पोलीस उप-आयुक्त, (मुख्यालय), (परिमंडळ), (गुन्हे/विशा), सोलापूर
०४. जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, सोलापूर यांना प्रसिध्दी करीता सस्नेह अग्रेषीत
०५. प्रभारी अधिकारी, माहिती कक्ष, पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर.

२/- **सदरचा आदेश हा सर्व दैनिक/स्थानिक वृत्तवाहिनीवर प्रसिध्दीस द्यावा.**